# श्री अनंतानंद साईश् यांचे शिष्योत्तम

# प.पू. भक्तराज महाराज व प.पू. रामानंद महाराज

## विषयसूची


१. लेखक श्री. अशोक भांड यांचा परिचय ६

२. ‘सर्वांनी श्री. अशोक भांड यांनी लिहिलेल्या ‘सद्‌गुरुमहिमा’ या ग्रंथातील अनुभव आणि अनुभूती वाचून सद्‌गुरूंचे प्रेम प्राप्त करून घ्यावे’, हा आशीर्वाद ! – प.पू. जीजी (श्रीमती सुशीला दिनकर कसरेकर) ७

३. श्रीयुत अशोक भांड यांच्या भक्तीपूर्ण गुरुसेवेचे फलित म्हणजे ग्रंथ ‘सद्‌गुरुमहिमा’ ! – डॉ. विठ्ठल माधव पागे ८

४. प.पू. भक्तराज महाराज अन् प.पू. रामानंद महाराज यांच्या मधुर आठवणींचा संग्रह असलेला ग्रंथ म्हणजे ‘सद्‌गुरुमहिमा’ ! – श्री. शरद रामकृष्ण बापट ९

५. गुरुसेवा आणि गुरुभक्ती यांचे माहात्म्य साधकांच्या हृदयावर कोरणारा ग्रंथ ! – डॉ. जयंत आठवले १०

६. श्री. अशोक भांड यांचे मनोगत १३

७. प.पू. भक्तराज महाराज यांचा एक-एक शब्द टिपून त्या ज्ञानगंगेतून अनेक ग्रंथांची निर्मिती करणारे शिष्य डॉ. जयंत आणि डॉ. (सौ.) कुंदा जयंत आठवले ! – श्री. अशोक भांड १७


## ग्रंथाची अनुक्रमणिका

(काही प्रकरणांतील वैशिष्ट्यपूर्ण मथळे पुढे दिले आहेत.)


प्रकरण १. मानवी जीवनाचा उद्देश आणि संत अन् गुरु यांचे कार्य १९

प्रकरण २. श्री अनंतानंद साईश् यांचा आश्रम आणि गादी २५

प्रकरण ३. दिनकरचा जन्म, बालपण आणि त्याला झालेली गुरुभेट ३९

प्रकरण ४. दिनकरला गुरुमंत्र मिळणे आणि गुरूंनी त्याचे ‘भक्तराज’ असे नामकरण करणे ३६

४ ई. दिनूची अनंत जन्मांची साधना फळास येणे आणि त्याची द्वैतातून अद्वैताकडे वाटचाल होण्यास प्रारंभ होणे ३७

प्रकरण ५. दिनकरने केलेली गुरुसेवा ४०

५ अ. पूर्वी कधीही काव्यरचना केलेली नसतांना दिनूने गुरुप्राप्तीनंतर श्री गुरूंची महती भजनाच्या माध्यमातून वर्णन करणे ४०

प्रकरण ६. श्री अनंतानंद साईश् यांनी दिनूच्या कुटुंबाचे दायित्व घेणे आणि त्याला घडवणे ४७

६ अ. सद्गुरूंच्या कृपेने दिनूची झालेली अहर्निश ध्यानमग्न अवस्था ! ४७

प्रकरण ७. श्री. रामजीदादा आणि दिनकर यांनी गुरूंची अनन्यभावे केलेली सेवा ५३

प्रकरण ८. गुरूंचे अध्यात्मप्रसाराचे स्वप्न साकार करण्यासाठी झटणारे दिनू आणि श्री. रामजीदादा ! ५९

८ ई. गुरुसेवेत चूक झाल्यावर तीव्र खंत वाटणारा दिनू आणि भक्तवत्सल श्री अनंतानंद साईश ! ६२

प्रकरण ९. श्री अनंतानंद साईश् यांचे महानिर्वाण आणि त्यांची साजरी झालेली पहिली पुण्यतिथी ६८

प्रकरण १०. प.पू. भक्तराज महाराज यांचे कार्य आणि त्यांच्या जीवनात सद्गुरूंचे संतांच्या रूपात आगमन होणे ७५

प्रकरण ११. श्री. रामजीदादा यांनी प.पू. भक्तराज महाराज यांची समर्पणभावाने केलेली सेवा ८९

११ आ. प.पू. बाबांनी श्री. रामजीदादा यांचे केलेले कौतुक ! ८९

प्रकरण १२. प.पू. भक्तराज महाराज यांचा ‘अमृत महोत्सव सोहळा’ ९१

प्रकरण १३. प.पू. भक्तराज महाराज यांची कुडाळ येथील गुरुपौर्णिमा आणि त्यांचे महानिर्वाण ९७

प्रकरण १४. प.पू. भक्तराज महाराज यांच्या महानिर्वाणानंतर प.पू. रामानंद महाराज यांनी केलेले कार्य १०१

## विषयसूचीतील क्रमांक ६

# श्री. अशोक भांड यांचे मनोगत

‘जानेवारी १९५९ मध्ये प.पू. भक्तराज महाराज (प.पू. बाबा) आणि श्री. रामजीदादा यांचे आमच्या घरी (आणि माझ्या जीवनातही) प्रथम आगमन झाले. प.पू. भक्तराज महाराज यांचे गोड बोलणे आणि वागणे, यांमुळे मी त्यांच्याकडे आकर्षिला गेलो. माझे त्यांच्यावर प्रेम जडले. मला त्यांचा सहवास हवाहवासा वाटू लागला. यास्तव वर्ष १९६० पासून मी त्यांच्याकडे नियमितपणे जाऊ लागलो. (तेव्हा प.पू. बाबा श्री. रामजीदादा यांच्या घरी रहात होते.) मला त्यांची सेवा करण्यात आनंद मिळू लागला.

## सद्‌गुरूंनी अध्यात्माचे धडे देणे

प.पू. बाबांचा कृपाशीर्वाद, तसेच त्यांची ‘भजन, नामस्मरण आणि भंडारा (अन्नदान) ही त्रिसूत्री’ यांमुळे विद्यार्थीदशेतच माझ्यात आध्यात्मिक जीवन जगण्याची आवड निर्माण झाली. दोन्ही सद्‌गुरूंचा (प.पू. भक्तराज महाराज आणि प.पू. रामानंद महाराज यांचा) लाभलेला सहवास आणि सत्संग, त्यांनी वेळोवेळी केलेले मार्गदर्शन, त्यांची प्रत्येक कृती, त्यांनी दिलेल्या अनुभूती आणि मला झालेले दृष्टांत यांतून मला ‘अध्यात्म म्हणजे काय ?’, हे शिकायला मिळाले. ‘प्रपंच साधून परमार्थ कसा करावा ?’, हे मला उमगले. मी अज्ञानी असल्याचीही जाणीव मला त्यांच्या कृपेने झाली. सद्‌गुरूंचा सत्संग, सहवास आणि त्यांची सेवा घडत असल्याने मला अध्यात्माचे प्रत्यक्ष धडेच गिरवावयास मिळाले. आजही हा क्रम यथावत चालू आहे. जीव आत्म्याला भेटतो, त्या वेळी जे सुख (आनंद) अनुभवतो, त्या सुखाचा (आनंदाचा) अनुभव मला आजही पावलोपावली भजन आणि नामस्मरण यांच्या माध्यमातून मिळत आहे. सद्‌गुरु चैतन्यस्वरूपात सदैव आनंदाची अनुभूती देत आहेत.

## ‘भक्तीमार्ग’ प्रशस्त करणारे प.पू. बाबा आणि प.पू. दादा !

साईस्वरूप श्रीमत् अनंतानंद साईश् यांच्या या दोन सत्‌शिष्यांनी ‘हरि ॐ तत्सत्’ या सिद्ध, शक्तीशाली, अत्यंत परिणामकारक, चैतन्यपूर्ण मंत्राने असंख्य भक्तांना आणि साधकांना एका सूत्रात बांधले. त्या भाग्यवंतांतील मी एक अज्ञानी सेवक आहे. या दोन्ही सद्‌गुरूंनी नामस्मरणाच्या सूक्ष्म द्वारातून आणि भजनांच्या माध्यमातून आमच्या अंतःकरणात स्थायी निवास करून आम्हाला ‘भक्तीमार्ग’ प्रशस्त करून दिला अन् आम्हा सर्वांचे कल्याण केले. या सद्‌गुरुद्वयींमुळेच ‘भक्तीपताका’ शिखरावर रोवली गेली. धन्य हे सद्‌गुरुद्वयी !

## प.पू. बाबांनी स्वप्नदृष्टांत देऊन ग्रंथासाठी लेखन करण्यास सांगणे

प्रस्तुत ग्रंथाविषयी सांगायचे, तर जानेवारी २०२० मध्ये ब्राह्ममुहूर्तावर या अज्ञानी बालकास स्वप्नदृष्टांत देऊन प.पू. बाबांनी आदेश दिला, ‘(शिवी दिली) इतक्या वर्षांपासून तू माझ्याकडे येत आहेस, तर ‘माझ्याकडून काय शिकलास ?’, ते जरा कळू दे लोकांना !’ F (BMCh-ABh-L)

## सनातन संस्थेचे संस्थापक परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांना या स्वप्नदृष्टांताविषयी सांगितल्यावर त्यांनी ‘तुमचा ग्रंथ छापूया !’, असे सांगणे

सद्‌गुरूंच्या आदेशानुसार केवळ त्यांच्याच कृपेने मी ग्रंथ लिहिला. ग्रंथासाठी टीपणे काढतांना सनातन संस्थेचे संस्थापक परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या जीवनातून मिळालेली ‘जिज्ञासू हाच ज्ञानाचा खरा अधिकारी असतो !’, ही अमूल्य शिकवण माझ्या उपयोगी पडली. यातूनच मला प्रेरणा मिळाली; कारण त्यांनी प्रकाशित केलेले ग्रंथ वाचून ‘सद्‌गुरूंचा प्रत्येक शब्द किती मूल्यवान असतो !’, हे मला आधीच पटले होते.

काही दिवसांनंतर ग्रंथाविषयी मी परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांना सांगितले असता त्यांना पुष्कळ आनंद झाला. ते म्हणाले, ''तुम्ही केलेले सर्व लिखाण मला टंकलिखित (डी.टी.पी.) करून पाठवा. आपण त्याचा ग्रंथ छापूया.'' त्यांची उत्सुकता पाहून मला फार आनंद झाला. त्यांच्याशी झालेल्या वार्तालापाने माझा उत्साह द्विगुणीत झाला. त्यांनी माझे लिखाण न पहाता माझ्यावर दाखवलेला विश्वास पाहून मी भारावून गेलो. त्यांचे आभार मानण्यासाठी माझ्याकडे शब्द नाहीत. मी त्यांचा सदैव कृतज्ञ राहीन. F (DrKW-Gr + DrV-Pri-Sm + DrKou-Bha + BMCh-ABh-L)

## ग्रंथासाठी साहाय्य केलेल्यांचे आभार !

प्रस्तुत ग्रंथ लिहिण्यासाठी डॉ. वि.मा. पागे, उज्जैन (मध्यप्रदेश) यांच्याकडून मार्गदर्शन आणि प्रेरणा मिळाली. 'सत्य ते समोर आले पाहिजे', हे त्यांचे उद्गार मला बळ देणारे ठरले. 'श्री अनंतानंद साईश् शैक्षणिक एवम् पारमार्थिक सेवा ट्रस्ट, इंदूर (मध्यप्रदेश)' या संस्थेचे अध्यक्ष श्री. शरद बापट यांनी ग्रंथ लिहिण्यास प्रोत्साहन दिले. या दोघांचे मनस्वी आभार !

माझे लेखन तपासून, सुधारून त्याचे संगणकावर टंकलेखन (D.T.P.) करवून घेण्याचे कठीण काम माझे प्रिय गुरुबंधू श्री. भालचंद्र दीक्षित (छंदा), नाशिक (महाराष्ट्र) यांनी 'कोरोना' या साथीच्या रोगाच्या काळातही कष्ट घेऊन श्री. मिलिंद जोशी, 'क्रिएटीव्ह ॲडव्हर्टायझर', नाशिक यांच्याकडून करवून घेतले. या दोघांचा मी अत्यंत आभारी आहे.

'सनातन संस्था', तसेच सनातनचे रामनाथी आश्रमातील साधक श्री. दिनेश शिंदे, श्री. संजय मुळ्ये, श्री. अजित तावडे, साधिका सौ. मनीषा पानसरे, सौ. अरुणा तावडे, कु. दीपाली होनप, कु. अंजली क्षीरसागर, कु. तृप्ती कुलकर्णी, सोनाली बधाले आदी अनेकांनी या कार्यात प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष हातभार लावून कार्य सिद्धीस नेले. या सर्वांचा मी आभारी आहे.

## कृतज्ञता !

या लेखनातील जे चांगले आहे, ते सर्व सद्‌गुरूंचे आणि जे न्यून आहे, ते या सेवकाचे. सद्‌गुरूंच्या कृपेने मी आजवर थोडेसे आध्यात्मिक लेखन करू शकलो. प्रस्तुत ग्रंथातील लेखनही सद्‌गुरूंनीच त्यांच्याच छत्रछायेखाली माझ्याकडून लिहून घेतले. आता 'त्यांनी मला त्यांच्या चरणी विसावा द्यावा', हीच माझी शेवटची इच्छा ! 'साधक आणि भक्त यांना हा ग्रंथ उपयोगी ठरो', ही एकमेव अपेक्षा !'

सर्व तुझे हे तूच सावरी । तू चित्घन कल्पतरू । तुझी कशी सेवा करू ।।

त्याचप्रमाणे मला जन्म देणाऱ्या माझ्या आई-वडिलांचा मी सदैव ऋणी असेन; कारण त्यांच्यामुळेच मला हे समर्थ सद्‌गुरुद्वयी लाभले.

हे ग्रंथपुष्प सद्‌गुरुचरणी अर्पण करतांना मला अतीव आनंदाची अनुभूती येत आहे.

ज्या स्मरणमात्रे मिळे सौख्य जिवा ।
असा जन्मोजन्मी सद्‌गुरु हा मिळावा ।
सदा देह लागो सत्कारणाला ।
नमस्कार साष्टांग गुरुमाऊलीला ।।'



- श्री. अशोक भांड, इंदूर (३०.१२.२०२१) F (BMCh-ABh-L)

टीपा १. प्रस्तुत ग्रंथात श्री अनंतानंद साईश् यांना उद्देशून 'मोठे बाबा', 'श्री मोठे बाबा', 'श्री साईश्', असे, तसेच प.पू. भक्तराज महाराज यांना उद्देशून 'दिनू', 'दिनकर', 'प.पू. बाबा', असे संबोधले आहे.

२. ग्रंथात ठिकठिकाणी प.पू. भक्तराज महाराज यांच्या भजनांच्या पंक्ती दिल्या आहेत. इतर संत आणि भक्त यांनी लिहिलेल्या भजनांच्या पंक्तींचे संदर्भ त्या त्या ठिकाणी दिले आहेत.

३. ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.